महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९/२६१२६९४० @ : prash.dhepune@gov.in

---

क्र.उशिसं/प्रशा-१/टे.क्र.१/ससं नियुक्ती/(ई-६७८३३१) दिनांक १६ जूलै, २०२५

# परिपत्रक

विषय : उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेसाठी विहित अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविणेबाबत.

वाचा: १. शासन निर्णय क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१, दि. ६.५.२०२५
२. शासन पत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१, दि. १०.७.२०२५
३. शासन निर्णय क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१, दि. १०.७.२०२५

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन सदर पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांची नियुक्ती करण्यास काही अतिरिक्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेऊन १० विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण तसेच ०२ सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी संदर्भाधिन अ.क्र. ३ येथील दि.१० जूलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवड समिती गठीत करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय दि. ६ मे २०२५ अन्वये, उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी उमेदवारांची पात्रता पुढीलप्रमाणे विहित करण्यात आलेली आहे.

**i) विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) :**

१) पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५५ टक्के गुण.

२) पी.एच.डी. पदवी.

३) प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक (निवडश्रेणी / AL-१२), ९ वर्षे शिकविण्याचा अनुभव.

{या अनुभवाबाबत स्पष्ट करण्यात येते की, प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक (निवडश्रेणी / AL-१२) या पदावर / वेतनश्रेणीत कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच एकुण ९ वर्षे पदवी / पदव्युत्तर महाविद्यालयामध्ये शिकविण्याचा अनुभव (Professor / Associate Professor with aggregate experience of not less than nine years in the field of teaching at degree / postgraduate degree

colleges) असणे आवश्यक आहे.}

४) प्रशासकीय कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव.

५) पी.एच.डी. धारण केल्यानंतर किमान ३ प्रकाशने.

६) कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे.

ii) **सहसंचालक (प्रशासन):**

१) वरिष्ठ प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ या संवर्गातील पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

२) प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ या संवर्गातील पदाचा किमान ६ वर्षाचा अनुभव.

३. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांवर देण्यात येणारी नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात असून, २ वर्षाकरिता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा इतर कोणत्याही कारणास्तव पुढील शासन आदेश होईपर्यंत यापैकी पैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील.

४. उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदासाठी संदर्भाधिन शासन निर्णय दि. ६ मे २०२५ मध्ये नमुद केल्यानुसार विहित अटींची पूर्तता करणाऱ्या **उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय महाविद्यालये / शासकीय संस्था / शासकीय अध्यापक महाविद्यालये / शासकीय कार्यालये येथील इच्छुक उमेदवारांनी दि. ३१ जूलै, २०२५ अखेरपर्यंत** संचालनालयास विहित नमुन्यामध्ये परिपूर्ण भरलेला अर्ज, सेवा तपशील व तद्अनुषंगिक कागपदत्रांसह अर्ज सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून, सर्व पात्र उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 16-07-2025 15:07:13

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय महाविद्यालये / शासकीय संस्था / शासकीय कार्यालये (उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील)

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीस्तव सादर.

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) पदावरील तात्पुरत्या नियुक्तीसाठी आवेदनपत्र

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | : | |
| २ | जन्मतारीख | : | |
| ३ | वय (३१ जूलै २०२५ रोजी) | : | ..................वर्षे..................महिने.............दिवस |
| ४ | संपर्काचा पत्ता | : | |
| | कार्यालय | : | |
| | निवास | : | |
| ५ | संपर्क क्रमांक | : | |
| ६ | ई-मेल आयडी | : | |
| ७ | जात / जातीचा प्रवर्ग | : | |
| ८ | शासकीय पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक | : | |
| ९ | सध्याच्या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी (७ व्या वेतन आयोगानुसार) | : | |

१०  शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | पदवी व त्यापुढील शैक्षणिक अर्हता | विषय | निकालाचा /अधिसूचनेचा दिनांक | विद्यापीठाचे नांव | प्राप्त गुण (%) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

११.

| वरिष्ठ श्रेणी अथवा AGP 7000 / AL 11 | | निवड श्रेणी अथवा AGP 8000 / AL 12 | | सहयोगी प्राध्यापक AGP 9000 / AL 13 A | | प्राध्यापक AGP 10000 / AL 14 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थाननिश्चिती दिनांक | शासन आदेश क्रमांक व दिनांक | स्थाननिश्चिती दिनांक | शासन आदेश क्रमांक व दिनांक | स्थाननिश्चिती दिनांक | शासन आदेश क्रमांक व दिनांक | स्थाननिश्चिती दिनांक | शासन आदेश क्रमांक व दिनांक |
| | | | | | | | |

१२ एकूण शिकविण्याचा अनुभव (मान्यताप्राप्त) : ..................वर्षे..................महिने.............दिवस

| अ.क्र. | पदनाम | महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ | पासून | पर्यंत | कालावधी | | | विद्यापीठ मान्यता / शासन निर्णय क्र. व दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्षे | महिने | दिवस | |
| | | | | | | | | |

१३ प्रशासकीय अनुभव : ..................वर्षे..................महिने.............दिवस

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पदनाम | कामाचे स्वरुप | पासून | पर्यंत | कालावधी | | | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वर्षे | महिने | दिवस | |
| | | | | | | | | | |

१४ पीएच.डी. धारण केल्यानंतर किमान ३ प्रकाशने : (सोबत प्रती जोडाव्यात)

| Sr. No. | Title of paper | Journal Name, Page nos., Vol. no., Issue no., Year of publication | ISSN / ISBN NO. | Impact Factor if any | No. of Co-Authors | Whether Principal Author / Supervisor/ Co-supervisor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |

१५ इतर संशोधन कार्य :

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**:: प्रतिज्ञापत्र ::**

या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास मी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**सहसंचालक (१.सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व (२) सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई) पदावरील तात्पुरत्या नियुक्तीसाठी आवेदनपत्र**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | : | |
| २ | जन्मतारीख | : | |
| ३ | वय (३१ जूलै २०२५ रोजी) | : | ..................वर्षे..................महिने.............दिवस |
| ४ | संपर्काचा पत्ता | : | |
| | कार्यालय | : | |
| | निवास | : | |
| ५ | संपर्क क्रमांक | : | |
| ६ | ई-मेल आयडी | : | |
| ७ | जात / जातीचा प्रवर्ग | : | |
| ८ | शासकीय पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक | : | |
| ९ | सध्याच्या पदाचे पदनाम व वेनश्रेणी (७ व्या वेतन आयोगानुसार) | : | |

१० शैक्षणिक अर्हता :

| अ. क्र. | पदवी | विषय | निकालाचा दिनांक | विद्यापीठाचे नांव | प्राप्त गुण (%) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

११ प्रशासकीय अनुभव : ..................वर्षे..................महिने.............दिवस

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यालयाचे नाव | पासून | पर्यंत | कालावधी | | | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्षे | महिने | दिवस | |
| | | | | | | | | |

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**:: प्रतिज्ञापत्र ::**

या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास मी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी उमेदवारांची पात्रता विहित करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.बैठक - २०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६ मे, २०२५

**<u>वाचा</u> :-** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.२७५/ मशि-१, दि.०३ नोव्हेंबर, २०२२.

**<u>प्रस्तावना :-</u>**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन सदर पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांची नियुक्ती करण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेऊन संदर्भीय दि.०३ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये १० विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) तसेच ०२ सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी निवड समिती गठीत करण्यात आली असुन अतिरिक्त कार्यभाराने नियुक्तीसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव, अटी व शर्ती विहित करण्यात आल्या होत्या. संदर्भीय शासन निर्णयान्वये गठीत निवड समितीचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. सबब, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेसाठी सुयोग्य अधिकारी यांच्या निवडीकरीता अधिकतम पात्र उमेदवार उपलब्ध होणेसाठी उमेदवारांची पात्रता विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त १० विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) तसेच ०२ सहसंचालक (प्रशासन) या पदांवरील अतिरिक्त कार्यभाराने नियुक्तीकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा विहित करण्यात आहे:-

**i) विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) :**

१) पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५५ टक्के गुण.

२) पी.एच.डी. पदवी.

३) प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक (निवडश्रेणी/ AL-१२), ९ वर्षे शिकविण्याचा अनुभव.

{या अनुभवाबाबत स्पष्ट करण्यात येते की, प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक (निवडश्रेणी / AL-१२) या पदावर/ वेतनश्रेणीत कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच एकुण ९ वर्षे पदवी / पदव्युत्तर महाविद्यालयामध्ये शिकविण्याचा अनुभव (Professor / Associate Professor with aggregate experience of not less than nine years in the field of teaching at degree / postgraduate degree colleges) असणे आवश्यक आहे.}

४) प्रशासकीय कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव.

५) पी.एच.डी. धारण केल्यानंतर किमान ३ प्रकाशने.

६) कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे.

**ii) सहसंचालक (प्रशासन):**

१) वरिष्ठ प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ या संवर्गातील पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

२) प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ या संवर्गातील पदाचा किमान ६ वर्षाचा अनुभव.

२. **विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदावरील नियुक्तीचा कालावधी:**

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक या पदांवर देण्यात येणारी नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात असून, २ वर्षाकरिता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा इतर कोणत्याही कारणास्तव पुढील शासन आदेश होईपर्यंत यापैकी पैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०२५०५०६११४५५४११०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.05.06 11:47:14 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास), यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
९. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर.
१२. निवडनस्ती मशि-१.